ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १२ मार्च, १९५२ अंक ११

## विविध माहिती

**टेलिप्रिंटरचे तज्ज्ञ आले**—मि. अलेक्झांडर बीटी ह्या नांवाचे एक टेलिप्रिंटरचे तज्ज्ञ भारतांत आले आहेत. कोलंबो योजनेप्रमाणें त्यांचें आगमन झालें असून ते दोन वर्षें भारतांत राहणार आहेत. टेलिप्रिंटरचे तज्ज्ञ तयार करण्याच्या शाळा काढण्यासाठीं ते सल्ला देणार आहेत.

**पंजाबमधील नवे कालवे**—पूर्व पंजाबांतील फेरोझपूर आणि फरीदकोट जिल्ह्यांत दोन नवे कालवे जवळ जवळ पूर्ण झाले आहेत. भाक्रा धरण तयार झाल्यावर ह्या कालव्यांना सर्व वर्षभर पाण्याचा पुरवठा होईल. एका कालव्याची लांबी ५० मैल असून दुसऱ्याची ६० मैल आहे. पाणी पुरवठा सुरू झाल्यावर दोन लाख एकर जमीन पाण्याखालीं भिजेल.

**टांकसाळीसाठीं यंत्रसाहित्य**—अलिपूर येथें उभारण्यांत यावयाच्या टांकसाळीला लागणारी यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी भारतीय सरकारचा एक प्रतिनिधी परदेशीं गेला आहे. टांकसाळीला लागणारी चांदी गाळण्याची यंत्रसामुग्री तो विकत घेणार आहे. टांकसाळ जवळ जवळ पूर्ण झाली असून तींत नमुन्यादाखल नाणींहि पाडण्यांत येत आहेत.

**हिराकुदजवळ सोन्याची माती**—हिराकुद धरणासाठी महानदीच्या पात्रांत खणण्याचें काम चाललें असतां सोन्याची माती सांपडल्याचें समजतें. ह्या भागाचें भूस्तरशास्त्रदृष्ट्या परीक्षण करण्यांत आलेलें नव्हतें. तसें परीक्षण करवून घेण्यासाठी भारतीय सरकारला सूचना करण्यांत येत आहेत.

**४॥ आण्यांच्या वसुलीसाठी खर्च**—कर्जदलालीपायीं कित्येकदा कसें नुकसान होतें त्यासंबंधीं एक हकीकत म्हैसूर हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश श्री. मेदाप्पा ह्यांनीं सांगितली आहे. एका मुकादम्यांत अपील ऐकत असतां त्यांना असें आढळून आलें कीं ४॥ आण्यांच्या वसुलीसाठीं कागदपत्र छापण्याचा खर्च ४७० रुपये झाला होता !

**चेक्स् उर्दूंत काढण्याची तयारी**—पूर्व पाकिस्तानांत उर्दू ही राज्यभाषा म्हणून ठरविण्याविरुद्ध चळवळ चाललेली आहे. उलट, ती लोकप्रिय करण्यासाठी पाकिस्तान सरकारचे प्रयत्न चालू आहेत. बँकांचे अहवाल आणि चेक्स् उर्दू भाषेंत छापण्याची व्यवस्था पाकिस्तान स्टेट बँक करीत आहे. द्रव्यविषयक व अर्थविषयक शब्दांचा एक कोषहि लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

**विमानतळावर उंदरांचा उच्छाद**—द. आफ्रिकेंतील उत्तर केप प्रांतांत कुरुमान ह्या गांवीं एक विमानतळ आहे. विमानें उतरण्याची कॉंक्रीटची पट्टी उंदरांनीं इतकी खराब व धोकादायक केली कीं अखेर सदर विमानतळ बंद करण्यांत आला.

**पृथ्वीचें वय किती**—सुप्रसिद्ध रसायन शास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषक मिळविणारे प्रो. युरे ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं आपली पृथ्वी अस्तित्वांत आल्याला सुमारें ३०० कोटी वर्षें झालीं असावींत.

**इंडोचीनमधील युद्धाचा खर्च**—इंडोचीनमध्यें चालू असलेल्या युद्धासाठीं फ्रान्सला आतांपर्यंत ११०० अब्ज फ्रँक्स, म्हणजे सुमारें ३ अब्ज, १० कोटी डॉलर्स खर्च आला. फ्रेंच लष्कराचा १९४५ ते १९५१ अखेरचा खर्च वरील रकमेंत धरण्यांत आला आहे.

**ब्रह्मदेशाची तांदुळाची निर्यात**—१९५२ च्या पहिल्या सहा महिन्यांत ब्रह्मदेशाचें अॅग्रिकल्चरल मार्केटिंग बोर्ड १,७७, ३०० टन तांदूळ निर्यात करण्याची व्यवस्था करीत आहे. त्यापैकीं ७०,००० टन तांदूळ भारताला मिळणार आहे. भारताशिवाय सीलोन, इंडोनेशिआ, जपान, साऊदी अरेबिया, इत्यादि देशांनाहि तांदूळ पाठविण्यांत येणार आहे.

**सूर्यग्रहणामुळें रेल्वेला अधिक उत्पन्न**—गेल्या सूर्यग्रहणाचे वेळीं ईस्टर्न पंजाब रेल्वेनें कुरुक्षेत्राला जाणाऱ्या ६९ खास गाड्या सोडल्या. कुरुक्षेत्राला सुमारें ५ लाख यात्रेकरू गेले होते. त्यापैकीं २,००,०८९ यात्रेकरूंनीं रेल्वेनें प्रवास केला. रेल्वेला ८ लाख रुपयांचें उत्पन्न झालें. यात्रेंत ५,२५० स्त्रिया व मुलें चुकलीं होतीं. त्यांचा शोध करून त्यांना त्यांच्या नातेवाइकांकडे पोंचविण्यांत आलें.

**बोट कंपनींत सरकारचें भांडवल**—ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन ह्या कंपनींत भारतीय सरकारनें आतांपर्यंत १४८ लाख रुपये भांडवल गुंतविलें असल्याचें समजतें. कंपनीच्या खपलेल्या भांडवलाच्या ७४ टक्के भांडवल आतां सरकारचें झालें आहे.

**निझामचा नवा ट्रस्ट**—निझामनें आपल्या नातेवाइकांसाठी आपल्या जवळील जवाहिरांचा १२ लाख रुपयांचा एक ट्रस्ट केल्याचें समजतें. हें जडजवाहीर मुंबईला खास विमानानें नेण्यांत आलें आणि एका बँकेच्या ताब्यांत ठेवण्यांत आलें. निझामाचा हा शेवटचा ट्रस्ट आहे, असें कळतें.

## कंपनी काढणारांस लायकी आवश्यक करा

संपादक "अर्थ" ह्यांस सा. न. वि. वि.

आपल्या ३०-१-५२ च्या अंकांतील 'भारतांतील उद्योग उद्योगपती' या मथळ्याखालीं लिहिलेला लेख वाचला व मग मनाला एक प्रश्न विचारावासा वाटला, कीं अशा बिन-अनुभवी लोकांच्याकडून निघालेल्या बऱ्याच कंपन्या फक्त कागदावरच रहातात अगर भागीदारांचेकडून वसूल केलेला पैसा अपुरा पडून अगर अनाठायी अगर अनुभवाकरतां खर्च पडून १००त ४-५ कंपन्या कांहीं कालांतरानें नांवारूपास येतात. तेव्हां एकंदरींत हे सर्व प्रयोग भागीदारांना व देशाला सर्वस्वी महागच पडतात. म्हणून यापुढें तरी अशा प्रयोगादाखल कंपन्या निघून त्या अर्धवट किंवा पूर्ण बंद होण्यापेक्षां त्यांवर मुळांतच सरकारी बंधनें घालून त्यांना आळा घालावा. कंपनी काढावयाचीच झाली तर ज्यावेळीं काढणाऱ्यानें स्वतःचा पैसा खर्ची घालून कांहीं वर्षें ती चालवून किफायतशीर मार्गावर आणली तरच भागीदारांना भाग विक्रीस परवानगी देऊन मगच त्याच्या कर्तबगारीचा पूर्ण मोबदला त्याला दिला जावा. यावर कांहींचा आक्षेप असा आहे कीं भाग घेणारे कसे बनतात? त्यांनीं आपला पैसा गुंतवतांना योग्य ती काळजी कां घेऊं नये? हें म्हणणें अगदीं रास्त आहे. मी कांहीं नमुन्यादाखल कंपन्यांचीं नांवें देऊं शकेन. त्यांचा अहवाल लोकांनीं अभ्यासण्याजोगा आहे. या सर्व लिहिण्याचा उद्देश यापुढें जनतेचे पैसे वाया जाऊं नये एवढाच आहे.

मि. पॉल टेल्को यांनीं लिहिल्याप्रमाणें अनुभवाशिवाय किंवा त्या त्या धंद्याची सर्वांगी अपूर्णशी माहिति नसल्यानें त्यांची अंतिम परिस्थिति केविलवाणी झाली आहे व होत आहे. मी स्वतः कित्येक कंपन्यांतून सहानुभूति म्हणूनच मदत करून पुढें मागें मात्र आपणांस या आजच्या रकम गुंतवण्याचा थोडा फायदा व्हावा अशी अपेक्षा करीत होतो. परंतु अनुभव व आजचा त्या कंपन्यांची स्थिति पाहिल्यावर त्या कंपन्या काढणारांना अनुभवाच्या अभावीं भागीदारांना लुबाडण्याचें श्रेय मिळतें व आम्हांस अनुभवाचे अभावीं आमच्या पैशास चाट मारून घ्यावी लागली आहे. एवंच, आम्ही सर्वच एका माळेचे मणी! तेव्हां आमचे सरकारनें लिमिटेड कंपन्यांच्याकरतां जे कायदे केले आहेत त्यांची उजळणी करून कंपनी काढण्यापूर्वीच त्यांच्या मॅ. एजंटांना त्या त्या धंद्याविषयीं लायकी वगैरे बाबत निश्चित बंधनें घातलीं जावीत. निदान २५ लाखापर्यंतच्या कंपन्यांना तरी बंधनें असावींत. त्यावरच्या मोठ्या कंपन्यांच्या मॅ. एजंटांची लायकी व अनुभव यांची पूर्तता असल्याशिवाय ते येवढ्या मोठ्या कंपन्या काढण्यास तयार होणार नाहींत.

आपला,

बंडोपंत दातार

---

**कलकत्त्याजवळ रंगाचा कारखाना**—भारतीय सरकारनें एका प्रसिद्ध ब्रिटिश कंपनीला कलकत्त्याजवळ औद्योगिक रंगाचा कारखाना काढण्यास परवानगी दिली. इंडियन पेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एस्. एल्. मुरारका ह्यांनीं ह्या धोरणाचा निषेध केला असून सरकारनें रंगाच्या देशी कारखान्यांना उत्तेजन द्यावें, अशी सूचना केली आहे.

## १९५१ मधील ब्रिटनचें औद्योगिक उत्पादन

कच्च्या मालाच्या पुरवठ्यांत गेल्या वर्षी बराच तुटवडा भासला तरी सुप्रसिद्ध आर्थिक टीकाकार जॉन किंगस्ले यांच्या मतें ब्रिटनचें औद्योगिक उत्पादन ३ टक्क्यांनीं वाढलें. परंतु १९५० सालीं १९४९ च्या मानानें उत्पादनांत ८॥ टक्के वाढ झाली होती. १९५१ सालीं पोलाद, लोखंड मॅंगेनीज, तांबें व गंधक यांच्या तुटवड्यामुळें उत्पादनांत घट झाली. गेल्या वर्षी सुरवातीच्या भागांत कच्च्या मालाचा तुटवडा तीव्रतेनें जाणवत असतां आंतरराष्ट्रीय वस्तु-पुरवठा परिषदेच्या कार्यामुळें ब्रिटनला परिस्थितीला तोंड देतां आलें. युद्धसाहित्याच्या उत्पादनामुळेंहि एकंदर उपयुक्त उत्पादनावर थोडासा विरोधी परिणाम झाला. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या आर्थिक पाहाणीच्या अहवालावरून ब्रिटनचें उत्पादन १९५१ मध्यें निदान ४ टक्क्यांनीं वाढावें असा अंदाज होता. त्यापूर्वींच्या तीन वर्षांत उत्पादनांत वाढ दरवर्षी ७ टक्के झाली होती. १९४६ चें उत्पादन १०० मानल्यास, १९४७ सालीं १०८, १९४८ सालीं १२१, १९४९ सालीं १२९ व १९५० सालीं १४० झालें व गेल्या वर्षी म्हणजे १९५१ मध्यें तें १४४ झालें असावें. १९३५ ते ३८ च्या मानानें औद्योगिक उत्पादन ४० ते ४५ टक्क्यांनीं सुधारलें आहे.

गेल्या वर्षी कोळशाचें उत्पादन २॥ टक्क्यांनीं वाढलें, परंतु खप मात्र ३॥ टक्क्यांनीं वाढला. परंतु पोलादाच्या उत्पादनांत मात्र घट आली, व तें ६ लक्ष ५० हजार टनांनीं घटून १ कोटी ५६ लक्ष टन झालें. पोलादाच्या उत्पादनांतील घटीचा साहाजिकच परिणाम इंजिनियरिंगच्या धंद्यावर झाला. मोटारींचें उत्पादन त्यामुळें घटलें. परंतु विजेच्या मालाचें व आगबोटींचें उत्पादन मात्र वाढलें. ब्रिटनचा सर्वांत मोठा धंदा जहाजें बांधण्याचा असून गेल्या वर्षी बांधल्या जाणाऱ्या जहाजांपैकीं एक-तृतियांश जहाजें निर्गतीसाठीं होतीं. विशेषतः तेलवाहू जहाजांचें उत्पादन गेल्या वर्षी वाढून या जहाजांच्या आकारांत सुधारणाहि दिसून आली आहे. एका कंपनीला ४० हजार टनांचें प्रचंड तेलवाहू जहाज बांधण्याचें काम मिळालें आहे. कापड-धंद्याचें उत्पादनहि वाढलें. कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें रेयॉनचें उत्पादन कमी होईल अशी भीति वाटत होती, परंतु परिस्थितीला तोंड देण्यासाठीं जरूर तें कार्य केल्यामुळें रेयॉनचेंहि उत्पादन ३ टक्क्यांनीं वाढलें. यासाठीं परदेशांतून तंतूंची आयात करण्यांत आली. नवीन मार्गांनीं सल्फ्यूरिक ॲसिड मिळविण्यांत आलें, रासायनिक व इतर मूलभूत द्रव्यें उपलब्ध असलेल्या साठ्यांतून खर्च करण्यांत आलीं, व कमी गंधक लागेल अशा मालाचें उत्पादन चालू ठेवण्यांत आलें.

१९५१ च्या सुरवातीला कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या बाबतींत परिस्थिति चिंताजनक वाटत होती, परंतु वर्षाच्या अखेरीस कथील व ॲल्युमिनियम यांच्या बाबतींत अमेरिकेशीं करण्यांत आलेल्या करारामुळें परिस्थिति आटोक्यांत आली. परंतु अजूनहि पोलादाच्या बाबतींत तुटवडा जाणवत आहे. निर्गतीसाठीं उत्पादन व संरक्षणाच्या कार्यासाठीं उत्पादन यांना अग्रहक्क दिला जात आहे. या दोहोंना मदतहि दिली जात आहे. हें साधण्यासाठीं नुकतेंच बटलर यांनीं जाहीर केल्याप्रमाणें अंतर्गत गरजेसाठीं मोटारी, घरांना लागणारें सामान इ. नागरी गरजेच्या उत्पादनांत कपात करावी लागत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १२ मार्च, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रहाणीचें मान ह्याखेरीज सुधारणार नाहीं

मार्टिन्स बँक लि. च्या चेअरमनच्या निवेदनांत त्यांनीं राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाट्याची डिबेंचर्सवरील व्याज व शेअर्सवरील डिव्हिडंड ह्यांचेशीं मोठी उद्बोधक तुलना केली. ऑर्डिनरी भागावरील डिव्हिडंड मोठें हवें असेल, तर कंपनीचा कारभार कार्यक्षम असणें जरूर आहे; त्याचप्रमाणें आपली रहाणी सुधारावयाची असेल आणि सुखसोयी वाढवावयाच्या असतील तर राष्ट्रीय उत्पन्नहि, अपरिहार्य खर्च भागवून, बरेंच मोठें शिल्लक उरणें अगत्याचें आहे. भारतासारख्या देशांतील परिस्थितींत त्यांचे विचार विशेष मार्गदर्शक होण्याजोगे आहेत. श्री. शंकरराव किर्लोस्करांच्या भाषणांतून व लेखांतून हे मुद्दे अनेकवार आलेले आहेत. कारखानदारांनीं असे विचार अनेक वेळां मांडले असले तरी त्यावर कामगार एकतर्फीपणाचा आरोप करूं शकतात. परंतु, मोठ्या बँकेच्या चेअरमनच्या तशाच विचारांचा तरी निःपक्षपातीपणें विचार होण्यास हरकत नसावी.

महागाईची झळ प्रत्येकासच लागत आहे. प्रत्येकाला महागाई वेगवेगळ्या प्रकारें त्रासदायक होत आहे. कच्च्या मालाची किंमत वाढली व मजुरी वाढली म्हणजे उत्पादनखर्चहि वाढतो आणि जिनसा महाग बनतात. अन्नपदार्थ व कापड ह्यांच्या किंमतवाढीमुळें सामान्य जनांचें जीवन अवघड होतें. राष्ट्राच्या दृष्टीनें, आपला माल परदेशी पाठवून त्याच्या बदली आवश्यक जिनसांची आयात करणें अशक्य बनतें. १ रुपयास पूर्वी जेवढें मिळत होतें, तेवढें आतां मिळत नाहीं, ही गोष्ट प्रत्येक बाबतींत खरी आहे, आणि प्रत्येकजण त्याच्या रहाणीचा जो कांहीं दर्जा असेल, तो टिकविण्यासाठी ज्यास्त मजुरी, पगार अथवा नफा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. आठ आणे किंमतीचें काम करून १ रु. मिळविण्याची प्रत्येकजण अपेक्षा करूं लागला, तर १ रु. ची किंमत् आठ आण्यांवर येण्यास वेळ लागणार नाहीं, ही गोष्ट मात्र कोणाच्याच ध्यानांत येत नाहीं. असें जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत रुपयाला मिळणाऱ्या जिनसा कमी कमी होऊं लागणें अपरिहार्य आहे. ही घसरगुंडी थांबवावयाची असेल, तर रुपया मिळवितांना त्यापेक्षा ज्यास्त मोलाच्या कामाचा मोबदला प्रत्येकानें दिला पाहिजे. उत्पादनवाढीच्या आवश्यकतेची भाषा प्रत्येकजण बोलतो, परंतु त्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी मात्र दुसऱ्यावर लादतो. प्रत्येकानें, प्रत्येक दिवशीं, कामाची शिकस्त केल्याबिना रहाणीचा खर्च उतरणार नाहीं किंवा रुपयांची खरी किंमत वाढणार नाहीं.

एक रुपया आपणांस फक्त एकदाच खर्चतां येतो, हें सार्वें सत्य आहे. व्यक्तीप्रमाणें राष्ट्रीय बाबतींतहि तें खरें आहे, आणि तें मान्य केलें म्हणजे प्रश्न उपस्थित होतो कीं राष्ट्रीय तिजोरींत किती संपत्ति आहे, आणि तिचा खर्चांत चांगला विनियोग कसा करतां येईल ? मोठ्या कंपनींत गुंतविलेल्या भांडवलाच्या तीन प्रकारांच्या विशिष्ट अधिकारांशीं ह्याबाबत तुलना करणें बोधप्रद होईल.

कंपनीला जें उत्पन्न मिळतें, त्यावर पहिला अधिकार डिबेंचर्सवरील व्याजाचा असतो. त्यानंतर प्रेफरन्स भागांवरील नफा आणि शेवटीं ऑर्डिनरी भागांवर नफा, असा अनुक्रम लागतो. आपल्या मध्यवर्ती सरकारचा लष्करी खर्च एकूण उत्पन्नाचा मोठा भाग खाऊन जातो, परंतु आपल्या स्वातंत्र्यासाठी व सुरक्षिततेसाठी तो आवश्यकच आहे. त्या खर्चाचें स्वरूप डिबेंचर्सवरील व्याजासारखें, अग्रहक्काचें, आहे. अन्नधान्याच्या आयातीवरील खर्चाचें स्वरूपहि ह्याच प्रकारचें आहे. उत्पादनाचीं व इतर साधनें कार्यक्षम राखणें, तीं सुधारणें व त्यांत वाढ करणें ह्यांस लागणाऱ्या खर्चाचा अनुक्रम नंतर लागतो, आणि शेवटीं ( ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंडप्रमाणें ) कांहीं शिल्लक उरला तर सरकारी व खासगी खर्चास रक्कम मिळूं शकते. म्हणजे, आपल्या खाजगी रहाणीचा दर्जा किती उच्च व कनिष्ठ राहील हें त्यावर अवलंबून रहातें. सरकारला व स्थानिक स्वराज्य संस्थांना करांचें उत्पन्न किती मिळतें व त्यांतून रस्ते, इस्पितळें, शिक्षण, इत्यादींवर किती खर्च होऊं शकतो, हें सर्व पहिल्या दोन प्रकारचे खर्च भागून उरणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असतें. डिबेंचर्सवरील व्याज देऊन व प्रेफरन्स भागांस डिव्हिडंड देऊन ऑर्डिनरी भागांवरहि मोठें डिव्हिडंड सुटावयाचें असेल, तर त्यासाठी सबंध कंपनी भरभराटींत असावी लागते. कंपनीचा कारभार कार्यक्षम असेल, प्रत्येकजण कंपनीसाठी शक्य तेवढें काम कसोशीनें करीत असेल, तसें करण्यास प्रत्येकास आकर्षण वाटत असेल, तरच ऑर्डिनरी भागांस चांगलें डिव्हिडंड मिळण्याची शक्यता; उलट, व्यवस्थापक खर्चिक व निष्काळजी असतील, आणि दुसऱ्या टोकास कामगार असंतुष्ट व कामचुकार असतील, तर ऑर्डिनरी भागांच्या वाट्यास घेण्याजोगा वाढावा उरणें अशक्यच होईल.

ह्यावरून असें दिसून येईल, कीं सरकारचा लोकहिताच्या कामावरील खर्च वाढवावयाचा असेल, तर ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंडमधूनच तो भागवला जाणार आहे; म्हणजे आकाशांतून पडणारी ती देणगी नसून येथेंच कष्ट करून निर्माण करावयाची ती बाब आहे. हें प्रत्येकास जोंपर्यंत नीट समजणार नाहीं, तोंपर्यंत सरकारकडून भरमसाट कांहींतरी मिळण्याबाबत अपेक्षा निर्माण होणें घातुक ठरेल. प्रत्येकाचा प्रयत्न कसोशीचा व्हावा ह्यासाठी योग्य वातावरण निर्माण करण्याचें, काम अर्थात्च सरकारचें व जबाबदार नागरिकांचें आहे. प्रयत्न व कष्ट ह्यांस कार्यक्षमतेची जोड मिळाली, म्हणजे वरील उदाहरणांतील ऑर्डिनरी भागांचें डिव्हिडंड वाढण्यास सहाजीकच सहाय्य होईल; तें डिव्हिडंड इतकें मोठें होईल, कीं त्यांतून समाजाच्या सर्व घटकांस स्वास्थ्य प्राप्त होऊं शकेल.

---

**ब्रिटनमधील बेकारांची संख्या**—ब्रिटनमधील जानेवारीच्या मध्यापर्यंत ३,७८,००० हजार बेकार कामगारांनीं आपली नांवें नोंदवलीं. ह्या संख्येपैकीं १,१७,६०० बेकारांना आठ आठवड्यांपेक्षां अधिक काळ काम मिळालेलें नव्हतें.

## आजची मंदी काय दाखविते

**( भा. म. का. )**

मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक सादर करण्यांत आल्यावर कराच्या बाबतींत सवलती मिळणार नाहींत असें साधारणतः दिसून आल्यावर सर्वत्र औद्योगिक केंद्रांच्या ठिकाणीं थोडीशी मंदीची लाट पसरली आहे. सोन्याचा भाव तोळ्यामागें रु. १५ चे सुमारास उतरला. टाटा डिफर्डचा बाजारभाव एकदम घसरला. कापूसहि सरकारनें ठरवून दिलेल्या किंमतींत विकला जात नाहीं, व नुकसान होऊं नये म्हणून सरकार ठरवून दिलेल्या बाजारभावानें कापसाची खरेदी करील, असें ता. ५ मार्च रोजीं पार्लमेंटच्या अधिवेशनांत सरकारतर्फे सांगण्यांत आलें. साखर, साबूदाणा, साबण, तेल, नारळ इ. जीवनविषयक वस्तूंचे बाजारभाव व कांहीं औषधांच्या किंमतीहि १० ते १५ टक्क्यांनीं घटत चालल्या आहेत. वस्तूंच्या किंमतींतील हा उतार गरीब व मध्यमवर्गीय जनतेच्या दृष्टीनें इष्ट आहे. परंतु आजच्या उतरत जाणाऱ्या बाजारभावांचा विचार करतांना अन्नधान्य व कापड या मुख्य जीवनविषयक गोष्टींचे भाव उतरलेले नाहींत हें लक्षांत घेतलें असतां आज दिसून आलेली मंदी ही एकदम घबराट उत्पन्न करण्याइतकी जोरदार आहे, असें वाटत नाहीं.

हिंदमधील वस्तूंच्या बाजारभावांचा संबंध आंतरराष्ट्रीय गोष्टींशीं निकटचा आहे. कोरियन युद्धप्रकरण कायमचें निकालांत निघाल्यास बाजारांत मंदी व नंतर स्थिरता या गोष्टी निश्चित दिसूं लागतील. परंतु हें होईल कीं नाहीं हें मंद गतीनें चालणाऱ्या कोरियन वाटाघाटींवरून निश्चितपणें सांगतां येत नाहीं. अमेरिकेचें साठेबाजीचें धोरण सावकाशपणानें चालू आहे व अमेरिकेचें ज्यास्त लक्ष हिंदसारख्या आशियांतील मागासलेल्या राष्ट्रांना मदत देण्याचें गेल्या दोन महिन्यांतील घटनांवरून दिसून येत आहे. ब्रिटन प्रभृति स्टर्लिंग देशांतील राष्ट्रांची स्थितीहि व्यापाराच्या दृष्टीनें कमकुवत बनत चालली आहे. गेल्या आठवड्यांतील बातमीवरून स्टर्लिंग किंचित् आवरणार असें दिसत आहे. परंतु स्टर्लिंगची मूळची कमकुवत स्थिति कायमच आहे.

धान्य, कापड, उद्योगधंद्यांसाठी लागणारा कच्चा माल, औद्योगिक उत्पादन, या सर्वांचा भरपूर पुरवठा निर्माण झाला म्हणजे मग मंदी निर्माण होते व ती कांहीं वर्षे उलट दिशेनें पुन्हां चाकें फिरूं लागेपर्यंत टिकू शकते. या दृष्टीनें विचार करतां हिंदमध्यें आज अशी परिस्थिति निर्माण झालेली नाहीं. वाढती लोकसंख्या व अन्नधान्य आणि कापड यांचा तुटवडा या गोष्टी अजून कायम आहेत. आपल्या देशांत सोन्याचा भाव कृत्रिम कारणांनीं वाढलेला आहे. तो आज उतरला आहे त्या प्रमाणांत जरी स्थिर राहिला तरी ती गोष्ट सामान्य जनतेच्या दृष्टीनें इष्ट समजली पाहिजे. साठेबाजी व युद्धाची शक्यता या दोन कारणांमुळें निर्माण झालेली परिस्थिति आज अल्प प्रमाणांत निवळूं लागली आहे व तिचे पडसाद सोने, चांदी, साखर, तेल, इ. वस्तूंच्या बाजारभावांवर दिसून आले आहेत. मंदीला आवश्यक अशी पार्श्वभूमि अंतर्गत किंवा जागतिक दृष्ट्या अजून निर्माण झालेली नाहीं. आजच्या पडलेल्या बाजारभावांमुळें गरीब व मध्यमवर्गीयांना अल्पसें स्वास्थ्य मिळेल. परंतु व्यापारी व भांडवलदार लोकांनीं एकदम घबराट निर्माण करण्याचें कांहीं कारण आहे असें वाटत नाहीं.

## ॲटोमिक दिनदर्शिका

| | |
|---|---|
| ६ ऑगस्ट, १९४५ | हिरोशिमा |
| ३ ऑक्टोबर, १९४५ | ॲटोमिक शक्तीचें आंतरराष्ट्रीय नियंत्रण असावें, अशी प्रे. ट्रूमनची मागणी. |
| २४ जानेवारी, १९४६ | यु. नेशन्सच्या जनरल असेंब्लीनें ॲटोमिक एनर्जी कमिशनची योजना केली. |
| १४ जून, १९४६ | बरूच योजना—आंतरराष्ट्रीय ॲटोमिक डेव्हलपमेंट ॲथॉरिटीची योजना—यु. नेशन्समध्यें मांडण्यांत आली. ( ह्या योजनेप्रमाणें, ॲथॉरिटीनें ॲटोमिक बॉंबचे कारखाने चालवावे अशी कल्पना ) |
| १९ जून, १९४६ | सर्व ॲटोमिक अस्त्रांचा नाश करून, अशा अस्त्रांस बंदी करावी, अशी रशियाची प्रति-योजना. |
| ३१ डिसेंबर, १९४६ | यु. नेशन्सच्या ॲटोमिक एनर्जी कमिशननें बरूच योजना १० विरुद्ध ० मतांनीं मंजूर केली. पोलंड व रशिया तटस्थ. |
| ११ जून, १९४७ | जाहीर केलेल्या कारखान्यांच्या तपासणीस रशियाची संमति |
| ११ सप्टेंबर, १९४७ | योजलेल्या आंतरराष्ट्रीय अधिकार मंडळाबद्दल ॲ. ए. कमिशनचा तपशीलवार अहवाल. |
| १७ मे, १९४८ | रशियाला योजना अमान्य, म्हणून ह्याबाबत प्रयत्न तहकूब करावेत, असें ॲ. ए. कमिशनचें मत. |
| २५ सप्टेंबर, १९४८ | बंदी व नियंत्रण एकदम अंमलांत आणण्यास रशियाची मान्यता. |
| २३ सप्टेंबर, १९४९ | रशियांत ॲटोमिक बॉंब उडल्याची प्रे. ट्रूमनची घोषणा. |
| ३१ जानेवारी, १९५० | हैड्रोजन बॉंबच्या निर्मितीस प्रारंभ केल्याची प्रे. ट्रूमनची घोषणा |

**राजाच्या दफनविधीचा खर्च**—इंग्लंडचे मरहूम बादशहा सहावे जॉर्ज ह्यांच्या दफनविधीसाठी ब्रिटनला ५८,००० पौंड खर्च करावा लागला. परकीय पाहुण्यांच्या बडदास्तीसाठी ८,००० पौंड खर्च झाले. मिरवणूक व इतर खर्च ३५,९०० पौंड झाला. राजाचें शव वेस्ट-मिन्स्टर हॉलमध्यें अंत्य दर्शनासाठी ठेवण्यांत आलें होतें. त्यासाठी सुमारें ९,८५० पौंड खर्ची पडले. हा सर्व खर्च जादा तैनात खर्च म्हणून मंजूर करण्यांत आला.

**निवडून येऊनहि अनामत रक्कम जप्त**—मध्यप्रदेशांत श्री. बलदेव नांवाचे एक उमेदवार कॉंग्रेसच्या वतीनें सागरी मतविभागांत उभे होते. ते फक्त ५,००० मतें पडून निवडून आले. मतविभागांत एकूण ३२,००० मतें नोंदली गेलीं. श्री. बलदेव ह्यांना पडलेलीं मतें एकूण मतांच्या एक षष्ठांशापेक्षांहि कमी असल्यानें त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यांत आली. निवडणुकांच्या इतिहासांत हें असें पहिलेंच उदाहरण असावें.

## कोयना धरण तांवडतोब झालें पाहिजे

### हें लक्षांत असूं द्या!

नदीच्या तळापासून धरणाची उंची २६९ फूट. धरणाची लांबी ३०५० फूट.

विद्युतनिर्मिति पहिली अवस्था २ लक्ष ४० हजार किलोवॅट, दुसरी अवस्था ४ लक्ष, ८ हजार किलोवॅट, तिसरी अवस्था ४ लक्ष, ९८ हजार किलोवॅट.

धरणास येणारा खर्च अंदाजें ३१ कोटी रुपये.

धरण बांधण्यास लागणारा काळ अदमासें ७ वर्षे.

कोळसा अगर तेल यांच्या मदतीनें विद्युत्‌शक्ति निर्माण करण्यासाठी आज येणारा खर्च–दर युनिटास सुमारें ३॥ आणे.

कोळशावर चालणाऱ्या चोला येथील संभाव्य थर्मल स्टेशनमुळें येणारा खर्च–दर युनिटास १ आणा.

कोयना धरणांतून उत्पन्न होणाऱ्या विजेसाठी येणारा खर्च–युनिटास अर्धा आणा.

कोयना धरण विजेचा फायदा मिळणारा मुलुख–पश्चिमेस मुंबई ते पूर्वेस बार्शी–सोलापूर; उत्तरेस पुणें ते दक्षिणेस कोल्हापूर बागलकोट.

कोयना धरणामुळें पाणीपुरवठा होणारी जमीन–एकूण ४ लक्ष एकर.

कोयना धरण बांधणीसाठी लागणारें मनुष्यबळ–३०,०००

—संपादकीय, किर्लोस्कर, मार्च १९५२

---

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव
### (शेड्यूल्ड बँक)

वरील बँकेस १९५१ वर्षी मागील वर्षातील शिलकी नफा (७५४ रु. ८ आ. २ पै) धरून एकूण ९०,०५५ रु. १० आ. ९ पै नफा झाला. ३० जून, १९५१ अखेरच्या सहामाहीसाठी ६ लक्ष रु. वसूल भांडवलावर ६¼% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड दिलें, त्यास १८,७५० रु. लागले. आतां डायरेक्टरांनीं दुसऱ्या सहामाहीसाठीहि ६¼% डिव्हिडंड सुचविलें आहे, त्यास १८,७५० रु. लागतील. (म्हणजे सबंद वर्षाच्या ६¼% करमाफ डिव्हिडंडला ३७,५०० रु. होतात). रिझर्व्ह फंडाकडे २६,००० रु. वर्ग करून २४,००० रु. ची कर तरतूद केली जाईल व २,५५० रु. शिलकी नफा पुढील वर्षांत ओढला जाईल. बँकेचें वसूल भांडवल ६,००,००० रु. असून रिझर्व्ह व इतर फंडांत १,४१,७३८ रु. आहेत. त्यांत आतां २६,००० रु. ची भर पडणार आहे. ठेवींची रक्कम ६३ लक्ष रु. असून एकूण ताळेबंद ८२,५१,५९२ रु. चा आहे. बँकेच्या इनव्हेस्टमेंटची रिझर्व्ह बँकेनें सांगितलेल्या सरासरी बाजारभावाप्रमाणें किंमत ताळेबंदांतील मूळ पडलेल्या किंमतीपेक्षा ६८,२९३ रु. नीं कमी आहे. इतर बँकांच्या अनुभवापेक्षा ह्या बँकेचा अनुभव वेगळा असण्याचें कांहींच कारण नाहीं आणि ही तूट एकूण वसूल भांडवलांच्या किंवा वार्षिक नफ्यापेक्षा कितीतरी कमी आहे. सरकारी रोखे डिस्काउंटनें घेतले, त्यांची पूर्ण किंमत ठराविक वेळीं पदरांत पडणार असून ती घसारा सहज भरून काढण्यास पुरेशी आहे. बँकेच्या एकूण २२ शाखा असून तिचें कमिशन, एक्सचेंज व ब्रोकरेजचें उत्पन्न चांगलें आहे. बेळगांव बँकेच्या ठेवींत व खेळत्या भांडवलांत १९५० चे मानानें १९५१ मध्यें वाढच झालेली आहे. श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी., हे मॅ. डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा १८ मार्च रोजीं होणार आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

---

### फोर्ड फौंडेशनतर्फे मिळणारी मदत

फोर्ड फौंडेशनतर्फे भारताच्या शेतीविकासाला जी मदत करण्यांत यावयाची आहे तिची माहिती अन्नमंत्री श्री मुनशी ह्यांनीं नुकतीच भारतीय लोकसभेंत सांगितली. मदतीच्या योजनेप्रमाणें १५ राज्यांत शेतीच्या विकासाच्या योजना अंमलांत आणण्यांत येतील. प्रत्येक योजनेंत सुमारें १०० खेड्यांचा अंतर्भाव करण्यांत येणार आहे. ह्या निवडलेल्या भागांत सहकारी सोसायट्यांना उत्तेजन देणें, गांवाच्या सांडपाण्याची नीट व्यवस्था करणें, प्रौढांना साक्षर करणें, लागवडीच्या सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करणें, इत्यादी कार्यक्रम अंमलांत आणला जाणार आहे. त्याशिवाय शेतीच्या विकासाचें शिक्षण देण्यासाठी ५ केंद्रेंहि उघडण्यांत येणार आहेत. ह्या केंद्रांतून राज्य सरकारांकडून पाठविण्यांत आलेल्या कार्यकर्त्यांना शिक्षण देण्यांत येणार आहे. शिक्षणक्रम ९ महिन्यांचा असेल. ह्या कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष अंगमेहनत करूनच शिक्षणक्रम पुरा करावा लागेल. अशा प्रकारच्या पहिल्या केंद्राचें उद्घाटन मुंबई राज्यांत आनंद येथें गेल्या जानेवारी अखेर करण्यांत आलें. अशा प्रकारचीं आणखी केंद्रें उत्तर प्रदेश, म्हैसूर व मध्यप्रदेश ह्या राज्यांतून उघडण्यांत येणार आहेत. फोर्ड फौंडेशनकडून ह्या कामासाठी सध्या १२,००,००० डॉलर्स मदतीदाखल मिळणार आहेत. त्याशिवाय देशांतील शिक्षणसंस्थांना मदत करण्याची तयारीहि फौंडेशननें दाखविली आहे. ग्रामीण जीवनाचा विकास करण्यासाठी विशेष कर्तबगारी दाखवितील त्यांना अमेरिकेंत व इतर देशांत अधिक शिक्षणासाठी पाठविण्यासंबंधींहि फौंडेशनतर्फे मदत करण्यांत येणार आहे.

---

### १९५१ मधील व्यापाराची तूट कशी फेडली गेली

पार्लमेंटमध्यें अर्थमंत्र्यांनीं एका प्रश्नाला उत्तर देतांना पुढील माहिती सांगितली. गेल्या वर्षी परराष्ट्रांतून आयात ८५७ कोटी रुपयांची झाली, व परदेशांकडे निर्गत ७७५ कोटी रुपयांची झाली. परराष्ट्रीय व्यापारांतील ८२ कोटी रुपयांची प्रतिकूल तफावत भरून काढण्यासाठी दोन प्रकारच्या अदृश्य आयातींचा उपयोग झाला. एक अदृश्य आयात म्हणजे वहातुकीमुळें ४० कोटी रुपये हातीं आले व दुसरी अदृश्य आयात म्हणजे ७ कोटी रुपये विम्यामुळें हातीं आले. परदेशांत गुंतविलेल्या भांडवलामुळें ६ कोटी ५० लक्ष रुपये मिळूं शकले. स्टर्लिंग शिलकींतील उचल व अमेरिकेचें कर्ज यामुळेंहि परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत भरून येण्याला मदत झाली. पुढील कांहीं वर्षांत परराष्ट्रीय व्यापारांत प्रतिकूल तफावत झाल्यास वाहातूक व विमा यांच्यामुळें येणाऱ्या अदृश्य आयातींतून ही तफावत भरून निघूं शकेल असें मत अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केलें.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

भाग गेला । शीण गेला ।
अवघा झाला । आनंद ॥

—तुकाराम महाराज.

नवीन १००० टनांची मशिनरी सुरूं होऊन
१००० पोतीं साखर तयार झाली.

येत्या हंगामांत ७५००० पोतीं म्हणजे कंट्रोल दरानें
साठ लक्ष रुपयांची साखर तयार होईल.

शेअर-विक्री सुरू आहे

ता. ३१ मार्च १९५२ पर्यंत
*ठेवींची मुदत १ वर्ष—व्याज ६ टक्के*

शेअर व ठेवींचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० कॉमनवेल्थ बिल्डिंग,
सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. १५ जानेवारी १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स्.



# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अन्न व शेतकी खात्याची कामगिरी

१९५०–५१ सालीं भारतानें केलेल्या शेतकी–विषयक प्रगतीचा एक अहवाल भारतीय विधिमंडळांत अन्न व शेतकी खात्यातर्फे प्रसृत करण्यांत आला आहे. अहवालांतील माहिती त्रोटक स्वरूपांत पुढीलप्रमाणें आहे.

२,८०,००० एकर जमिनीमधून कान्स गवताचें उच्चाटन करण्यांत आलें व ३२,००० एकर जंगलांतील जमीन लागवडीस योग्य करण्यांत आली. कापूस, ताग आणि साखर ह्या पिकांच्या उत्पादनांत वाढ झालेली दिसून येते. ह्या वर्षी भारतानें अन्न, कापूस, ताग आणि साखर ह्यांच्याबाबत शक्य तितकी स्वयंपूर्णता निर्माण करावी असें ठरविण्यांत आलें होतें व त्या ध्येयाप्रमाणें पिकांचा कार्यक्रम आखण्यांत आला होता. आतां ह्या कार्यक्रमाचा समावेश पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आला आहे. १९५१–५२ सालीं १४ लाख टन अन्नधान्याचें अधिक उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. प्रत्यक्ष उत्पादन किती वाढलें त्याची माहिती अद्याप हातीं आली नाहीं. परंतु ठरविण्यांत आलेल्या उद्दिष्टापेक्षा उत्पादन फारसें कमी होणार नाहीं अशी आशा करण्यांत येत आहे. १९५०–५१सालीं अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी १९·४ कोटी रुपये मंजूर करण्यांत आले होते. त्यापैकीं ५·८ कोटी रुपये देणग्या म्हणून देण्यांत आले. आणि बाकीची रक्कम कर्जाऊ देण्यांत आली. वरील कामगिरीशिवाय वनमहोत्सवाच्या कार्यक्रमाची पहिली अवस्था पार पाडण्यांत आली आणि अरवली पर्वताच्या वायव्येकडील उतारावर झाडें लावण्याची मोहीम चालू करण्यांत आली. ही झाडी चांगली वाढीस लागली तर राजपुतान्याचें वाळवंट जें पसरत चाललें आहे, त्याला अटकाव करण्यास मदत होणार आहे.

### कॅनडांतील तज्ज्ञाचें हिंदच्या कामगारांबद्दल मत

कॅनडाचे एक प्रसिद्ध विक्रेते मि. टी. ए. मोर्फट यांनी मार्चच्या सुरवातीला मुंबईंत पुढील विचार व्यक्त केले. त्यांच्या मतें हिंदमध्यें यंत्रज्ञ व मध्यस्थ कारागीर कीं जे उत्पादन प्रत्यक्ष कसें वाढवावें हें दाखवूं शकतील, त्यांचा अभाव आहे. हस्तेकाम करणारे लोक विपुल आहेत परंतु ते योग्य दिग्दर्शकांच्या अभावीं उत्पादन वाढवूं शकत नाहींत. व्यवस्थापक वर्ग व तात्त्विक माहिती असणारांची संख्याहि पुष्कळ आहे, परंतु मुख्य उणीव आहे ती प्रत्यक्ष काम करणारांनीं आपलें उत्पादन कसें वाढवावें हें दाखवून देणारांची. मि. टी. ए. मोर्फट हे ९० वर्षांचे असून शिजविण्याची भांडीं तयार करणाऱ्या कॅनडांतील एका कारखान्यांचे प्रमुख आहेत. जगांतील एक मोठा उद्योगप्रधान देश हिंद होऊं शकेल असें त्यांचें मत आहे, परंतु योग्य रीतीनें विकास व मानवी श्रमांचा उपयोग झाला पाहिजे. उद्योगधंद्याचीहि दृष्टि लोकांमध्यें आहे, परंतु मानवी–श्रम सार्थकीं कसे लावावे व उत्पादन कसें वाढवावें, याच्या ज्ञानाचा अभाव आहे. त्यांच्या मतें मजुरांचे दर स्वस्त असल्यामुळें किंमती व राहणीचा खर्च हा हिंदमध्यें इतर देशांच्या मानानें फार कमी आहे. पैसेवाल्यांनीं अनेक उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याऐवजीं ज्या एखाद्या धंद्याच्या जोपासनेची व व्यवस्थेची त्यांना पूर्ण माहिती असेल अशाच धंद्यांत त्यांनीं भांडवल गुंतविणें बरें. मि. टी. ए. मोर्फट यांनीं गेल्या ५० वर्षांत पांच वेळां जगप्रवास केला असून त्यामुळें खरी आंतरराष्ट्रीय दृष्टि विक्रेता या नात्यानें व नवीन कल्पनांच्या प्रसृतीच्या दृष्टीनें त्यांना प्राप्त झाली आहे, असें त्यांचें मत आहे.

## कोपरगांव तालुक्यांतील नियोजित सहकारी साखर–कारखाना

### सहकारी बांधवांस व शेतकऱ्यांस कळकळीची विनंती

कोपरगांव तालुक्यांतील शेतकऱ्यांचें मुख्य पीक उसाचें असून त्याच्यापासून होणाऱ्या गुळाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असतें. यामुळें या धंद्यावरच तालुक्यांतील बहुशः लोकांचें आर्थिक जीवन निगडीत झालें आहे. तथापि गेल्या बऱ्याच वर्षांतील अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, गुळाचे भावांत नेहमीं चढउतार झाल्यामुळें या धंद्यावर व शेतकऱ्यांच्या एकंदर राहाणीवर अनिष्ट परिणाम होतात. ही गोष्ट आजच्या गुळाच्या भावामुळेंही आपणांस तीव्रतेनें भासत आहे. या भाव चढउतार राक्षसाच्या तावडींतून सुटून शेतकऱ्यांस आपलें जीवन सुखी व समृद्ध करण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे गुळाऐवजीं साखर तयार करणें. साखरेस अखिल भारतांत खप असून त्यास योग्य किंमत मिळून सरकारी सहाय्यही आहे व त्यास हिंदुस्थानाबाहेरीहि मागणी आहे. शिवाय कारखान्याच्या क्षेत्रांतील शेतीचें यांत्रिकीकरण व सुधारणा होऊन उत्पादनही वाढून शेतकऱ्यांचा दुहेरी फायदा होणार आहे.

यामुळें कोपरगांव तालुक्यांतील लोकांचा सहकारी पद्धतीवर साखर–कारखाना शक्य तितक्या लौकर होणें हें शेतकऱ्यांच्या व राष्ट्राच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीचे आहे. एक पेक्षा अधिक जेवढे होतील तेवढे सहकारी कारखाने व्हावयास पाहिजेत; परंतु प्राप्त परिस्थितींत निदान एक तरी असा कारखाना तालुक्यांत जलदीनें होऊन त्यांत सामील होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळण्याच्या दृष्टीनें निदान पांच लाख प्राथमिक शेअर भांडवल लौकर जमविणें अत्यंत अगत्याचें आहे. याच हेतूनें प्रेरित होऊन दोन लाख शेअर भांडवल जमविलें आहे व आणखी तीन लाख रुपये शक्यतों लौकर गोळा केल्यास आपणांस पुढच्या गळितास कारखान्याचा निश्चित फायदा घेतां येईल व गुळाच्या भावाच्या घसरगुंडीच्या मगरमिठींतून शेतकऱ्यांस आपले प्राण वाचवितां येतील. तरी सर्व शेतकऱ्यांस कळकळीची विनंती कीं, त्यांनीं अत्यंत जलदीनें या कार्यांत सामील होऊन नियोजित शेअर भांडवल लौकर जमा करून आपला स्वतःचा व राष्ट्राचा उद्धार करावा.

—शेतकरी

दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कं. लि.
हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.
★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.
शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

**अखिल भारतीय आंबा-प्रदर्शन**—येत्या मे अगर जून अखेर बंगलोर येथें एक अखिल भारतीय आंबा प्रदर्शन भरवि-ण्यांत येणार आहे असें समजतें. आंब्यांचा हंगाम सुरू झाल्यावर प्रदर्शनांत भाग घेऊं इच्छिणाऱ्यांच्या सल्ल्यानें नक्की तारीख ठरविण्यांत येईल. म्हैसूर हॉर्टिकल्चरल सोसायटीतर्फे हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**मध्य भारतामधील हातमागाचा धंदा**—मध्य भारतामधील हातमागावर तयार होणाऱ्या कापडाचें उत्पादन सरकारी प्रयत्नामुळें बरेंच वाढल्याचें कळतें. १९५१ सालीं सप्टेंबर अखेर संपणाऱ्या ६ महिन्यांत सरकारच्या उद्योगखात्यानें ३·८९ लाख रुपये किंमतीचें कापड विकलें. १९५०–५१ ह्या सबंध वर्षांत २·८५ लाख किंमतीचें कापड विकण्यांत आलें होतें.

# NOTICE

## THE BELGAUM BANK Ltd., BELGAUM.

Notice is hereby given that the Annual General Meeting of the Share-holders of the Bank, will be held on Tuesday, the 18th March 1952, at the Registered Office of the Bank, viz. 'Balloli Building' Raviwar Peth, Belgaum at 1 P. M. to transact the following business :—

1. To receive and adopt the Report of the Directors and the Audited Statement of Accounts for the year ended 31st December 1951.

2. To declare a dividend.

3. To fill up the Vacancies caused by the retirement of your Directors Viz.

   (1) Shri. G. V. Saraf
   (2) „ N. S. Shirali
   (3) „ S. M. Muttur.

   The retiring Directors are eligible for re-election and they offer themselves for Re-election.

4. To appoint Auditors and to fix their remuneration.

5. A Share holder has given a Notice that he intends to propose the name of Shri R. V. Kulkarni, Chartered Accountant, as a joint Auditor for auditing some more branches and hence his appointment as a Joint Auditor.

6. To do such other work as may be placed before the meeting with the permission of or by the Chairman.

By order of the Board,

Belgaum, 8-2-1952. G. V. SARAF, Chairman.

The Transfer Books of the Company will be closed from 1st of March 1952 to 20th March 1952 both days inclusive.

The dividend when sanctioned will be paid on or after 24th March 1952. The Share Holders are requested to communicate their change of address if any.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay



फोनः ३४५११ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना**

**असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—**

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.





हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.